**ठळक बातम्या**

- देशातले महिला सुरक्षेचे कायदे सक्रिय करण्याची आणि या प्रकरणांचा निकाल लवकर लावण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- हरियाणा आणि जम्मू काश्मिर विधानसभेसाठी ४ ऐवजी ८ ऑक्टोबरला मतमोजणी, हरियाणातलं मतदान १ ऐवजी ५ ऑक्टोबरला

- व्हिएतनाममध्ये सायबर घोटाळे करणाऱ्यांच्या ताब्यातून ४७ भारतीयांची सुटका करण्यात यश

**आणि**

- पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत १० मीटर एयर पिस्तूल स्पर्धेत रुबिना फ्रान्सिसला कांस्य पदक

**<><><><><><>**

देशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कडक कायदे लागू केले आहेत. हे कायदे आणखी सक्रीय करायची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. अशा प्रकरणांचे निकाल जितक्या लवकर लागतील, तितकी आपण सुरक्षित असल्याची खात्री महिलांना पटेल, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन त्यांनी आज केलं. त्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं एक विशेष टपाल तिकीट आणि एका नाण्याचं प्रकाशनही मोदी यांच्या हस्ते झालं. सर्वोच्च न्यायालयाचा ७५ वर्षांचा प्रवास लोकशाहीची जननी म्हणून भारताची शान

आणखी वाढवतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. हा प्रवास भारताच्या राज्यघटनेचा आणि राज्यघटनेनं दिलेल्या मूल्यांचा आहे, असं ते म्हणाले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनीही जिल्हास्तरीय न्यायपालिका परिषदेला संबोधित केलं.

या परिषदेमुळे जिल्हास्तरीय न्यायपालिका आणि इतरांमध्ये संवादाला वाव मिळेल, असं मत त्यांनी मांडलं. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी, ई-न्यायालय उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी ७ हजार २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली.

**<><><><><><>**

वंदे भारत रेल्वेगाड्यांचा वाढता विस्तार, आधुनिकता आणि वेग हे विकसित भारताच्या दिशेनं पडलेलं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मीरत-लखनौ, मदुराई-बेंगळुरू आणि चेन्नई-नागरकोईल या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या गाड्यांमुळे देशातली महत्त्वाची शहरं आणि ऐतिहासिक शहरं जोडली जातील, मंदिरांचं शहर असा लौकिक असलेलं मदुराई माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रणी असलेल्या बेंगळुरूशी जोडलं जाईल, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. वंदे भारत जिथं पोहोचते आहे, तिथं पर्यटकांची संख्या आणि पर्यायानं तिथले उद्योग, रोजगाराच्या संधी वाढत आहेत, अनेक मार्गांवर वंदे भारत रेल्वे सुरू करण्याची मागणी होत असून या गाडीतही लवकरच स्लीपर कोच सुरू होणार असल्याची माहितीही प्रधानमंत्री मोदी यांनी दिली.

**<><><><><><>**

जैवतंत्रज्ञानातील अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार असं **BioE3 धोरण**

**केंद्र सरकारनं आज प्रसिद्ध केलं.** या धोरणामुळे देशातल्या जैविक उत्पादनामध्ये वाढ होईल असं विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंग म्हणाले. गेल्या आठवड्यात मंत्रीमंडळानं या धोरणाला मंजुरी दिली होती. या धोरणाचा परिणाम अन्ननिर्मिती, ऊर्जानिर्मिती आणि आरोग्य सेवांवर पडेल असंही त्यांनी सांगितलं. या धोरणाच्या अंमलबजावणीत सार्वजनिक खाजगी भागीदारीच्या आधारे रोजगार निर्मितीला चालना मिळू शकेल.

**<><><><><>**

प्रत्येक घराघरांत आयुर्वेद पोहोचवण्याची प्रधानमंत्र्यांची संकल्पना पूर्ण करण्यासाठी आयुष मंत्रालय कटिबद्ध असून येत्या पाच वर्षांत १० आयुष संस्था उभारण्यात येणार असल्याचं आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीतल्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद इथं झालेल्या एका कार्यक्रमात बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आर.जी. कार रुग्णालयामधील बलात्कार आणि पॉक्सो प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्याची विनंती पुन्हा पत्राद्वारे केली आहे. पश्चिम बंगालमधल्या सध्याच्या जलदगती न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांवर अन्नपूर्णा देवी यांनी चिंता व्यक्त केली. पश्चिम बंगालमध्ये ८८ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत, पण ती केंद्र सरकारच्या योजनेच्या शिफारशींनुसार नाहीत, असेही पत्रात नमूद आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख बदलली असून हरियाणात आता १ ऑक्टोबर ऐवजी ५ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. बिष्णोई समाजाच्या असोज अमावस्या उत्सावामुळे ही तारीख बदलण्यात आल्याचं आयोगानं म्हटलं आहे. अनेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी ही तारीख बदलण्याची विनंती केली होती. याबरोबरच जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आता ४ ऑक्टोबर ऐवजी ८ ऑक्टोबरला करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

व्हिएतनाममध्ये लाओस इथल्या सायबरकेंद्रामध्ये अडकलेल्या सत्तेचाळीस भारतीयांना भारतीय दूतावासाने सोडवलं आहे. ही सायबर केंद्रे म्हणजे सायबर घोटाळे करणारी केंद्रे होती.

बोकिओ परगण्यातल्या गोल्डन ट्रँगल सेझमध्ये ही केंद्रे सुरु होती. भारतीय दूतावासाने त्यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशातून याबद्दल माहिती दिली आहे. या सेझ मधल्या बेकायदेशीर कृत्यांचा छडा लावल्यावर यापैकी २९ जणांना भारतीय दूतावासाच्या स्वाधीन करण्यात आलं तर १८ जणांनी स्वतः दूतावासाशी संपर्क साधला. भारतीय राजदूतांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यापैकी ३० जण मायदेशात परतले किंवा वाटेवर आहेत. तर सतराजण प्रवासाची सोय होण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

**<><><><><>**

रशियाच्या कामचाटका भागातल्या वाझाहेट ज्वालामुखी जवळ एक एम आय ८ जातीचे हेलिकॉप्टर बेपत्ता झालं आहे. या हेलिकॉप्टरमध्ये एकूण २२ जण होते. आज सकाळी उड्डाण केल्यानंतर काही काळात संपर्क तुटला. हेलिकॉप्टरचा शोध सुरु आहे. यासाठी मदत आणि बचाव पथक रवाना करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जपानच्या संरक्षण मंत्र्यांनी २०२५ या आर्थिक वर्षासाठी संरक्षण विभागासाठी सर्वाधिक निधीच्या तरतूदीचा प्रस्ताव ठेवला आहे. पुढील वर्षासाठी ५९ दशलक्ष अमेरिकन डॉलरचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून काल झालेल्या बैठकीत या तरतूदीवर शिक्कामोर्तब करण्यात आलं. येत्या डिसेंबर मध्ये अर्थ मंत्रालयाबरोबर होणाऱ्या बैठकीत यावर विचारविनिमय होईल. पुढील आर्थिक वर्षात जपानी संरक्षण सिद्धता अधिक मजबूत करण्यासाठी या निधीचा वापर करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या निधी वितरणाच्या दुसऱ्या टप्प्याला आज नागपूर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सुरूवात झाली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात एक कोटी साठ लाख महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे जमा झाले असून १ हजार ५६२ कोटींहून अधिक रुपये वितरित झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात २५ लाख आणि त्यानंतरच्या टप्प्यात एक कोटी महिलांना आम्ही लखपती दिदी बनवणार आहोत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. या नोकऱ्या मागणाऱ्या नव्हे तर नोकऱ्या देणाऱ्या बहिणी असतील असं ते म्हणाले. महिलांच्या बाबतीत अपराध करणाऱ्याला आमचं सरकार जास्तीत जास्त सजा देईल, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताला आज आणखी एक पदक मिळालं. महिलांच्या १० मीटर एयर पिस्तूल स्पर्धेत रुबिना फ्रान्सिसला कांस्य पदक मिळालं. या स्पर्धेतलं भारताचं हे पाचवं आणि नेमबाजीतलं चौथं पदक आहे.

बॅडमिंटनमध्ये भारताच्या सुकांत कदम आणि सुहास यतिराज यांनी आपापल्या एकेरीच्या गटात विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केल्यानं भारताचं या खेळात किमान एक पदक निश्चित झालं आहे. तिरंदाजीत महिलांच्या कंपाऊंड प्रकारात सरिता देवी उपांत्य फेरीत पोहोचली आहे.

मात्र, भारताच्या स्वरूप उन्हाळकर याला पुरुषांच्या १० मिटर एअर रायफल स्पर्धेत १४ व्या स्थानावर समाधान मानावं लागल्यानं अंतिम फेरीत प्रवेश करण्यात अपयश आलं.

**<><><><><><>**

सप्टेंबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल, अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. सरासरीच्या १०९ टक्के पाऊस देशात होऊ शकतो. त्याचवेळी महाराष्ट्रासह काही भागात तपमान सरासरीपेक्षा जास्त असेल.

**//<><><><><><>//**